# वसई -विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती -"बी" विरार,(पूर्व.)
ता.वसई, जि.पालघर

जावक क्र. वविशम/नासो/विवि/८२ /१७-१८
दिनांक- ३०/०७/२०१८

## जाहिर सूचना

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "बी" बांधकाम विभागातील कार्यालया करीता वातानुकुलित यंत्रणा उपलब्ध करुन देणे बाबत आवश्यक आहे. तरी सदर कामास जाहिर सूचना प्रसिध्दी करणेत येत असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडील विद्युत परवाना धारकाकडुन कामाचे दरपत्रक प्रसिध्दीच्या दिवसापासून दिनांक ०४/०८/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत प्रभाग समिती (बी) विरार पूर्व कार्यालयात मागविण्यात येत आहे. प्राप्त झालेले दरपत्रक शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकळी ४.०० वाजता हजर ठेकेदार वा त्यांचे प्रतिनिधि यांच्या समोर प्रभारी सहा. आयुक्त यांच्या दालनात उघडण्यात येतील कोणतेही वा सर्व दरपत्रक कारण न देता नाकारण्याचा अधिकारी महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाही.

## ESTIMATE

**PWD DSR 2017-2018**

| Unit | Description | Rate (Rs.) | Total Amount (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 NOS | ITEM NO.=1<br>Supplying and erecting window modelmounted type room Air - conditioner 3star 230/250 V 50 cycles single phaseA.C.supply 1.5 TR capacity complete with gasR410A/R32 at position in provided recess withwooden frame as per specification No. APAC/WAC (2-1-13/46) | 37778.00 | 37778.00 |
| | | Total | **37778.00** |

## कामाचे दर

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील तुळींज रुग्णालय करीता नविन ट्युब लाईट व फॅन पुरवणे बाबत<br>अंदाजपत्रकिय रक्कम :- ३७,७७८/- | अंदाजपत्रकिय दरावर<br>अंकी ____________ %<br>अक्षरी ______________________ %<br>कमी / जास्त दराने काम करणेंस तयार आहे. |

## कामाबाबतच्या अटी व शर्ती

१. अंदाजपत्रकिय दरावर टक्केवारी स्वरुपात दर मागविण्यात येत असुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मान्यता प्राप्त विद्युत परवाना धारकाकडुन कामाचे दरपत्रक मागविण्यात येत आहे. उशीराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करुन स्वाक्षांकित न केलेले, सिलबंद न केलेले व सर्शत दरपत्रक फेटाळण्यात येतिल. कोणतेही अथवा सर्व दरपत्रक कारण न देता नाकारणेचा हक्क महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

२. दिवाबत्तीचे काम इंडियन ईलेक्ट्रीसिटी नियमाप्रमाणे करणे बंधनकारक आहे.

३. सदरचे काम उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करुन देणेस ठेकेदार बंधनकारक राहील.

४. निविदा फॉर्म मधिल पुरवठा करण्यात येणाऱ्या मालाचा दर गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST), वाहतुक खर्च व फिटींग खर्चासह भरावयाचे आहे. मंजुर दराव्यतिरिक्त इतर कुठलाही खर्च अदा केला जाणार नाही.

५. निविदा फॉर्म फि वरील गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) बाबत शासनाकडुन दिलेल्या निर्देशानुसार गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST)महानगरपालिकेत रोख्रीने भरणा करुन घेण्यात येईल.

Scanned by CamScanner

६. प्रत्यक्ष काम चालु असताना आजूबाजुच्या नागरीकांना, रहदारीचा त्रास, उपद्रव/वा हानी होणार नाही याची जबाबदारी ठेकेदाराची असेल व तसेच अशा वेळी कोणाचीही आर्थिक/जिवितहानी झालेस त्याची नुकसान भरपाई ठेकेदारांना करुन द्यावी लागेल. याबाबत आवश्यक ते विमा संरक्षण घेणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

७. सदरचे काम ठेकेदारास ६० दिवस मूदतीत पूर्ण करावे लागेल व कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच अपवादात्मक परिस्थितीत मा.उपायुक्त यांचा निर्णय अंतीम राहिल.

८. काम मुदतीत न झाल्यास प्रथमत : प्रतिदिन रु.१००/- एवढा दंड ठेकेदारांना अदा करावा लागेल. तसेच कामात प्रगती न आढळल्यास दंडाची रक्कम वाढविण्यात येईल.

९. ठेकेदारांना कामासाठी कार्यादेश दिलेनंतर त्वरीत कामाची सुरुवात करावी लागेल व सदर कामात हयगय केल्यास सदरचा मक्ता रद्द करुन त्याबाबत महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्यास ते मुळ ठेकेदाराकडून वसूल करणेचा अधिकार महापालिकेस राहील.

१०. ठेकेदाराच्या देयकातून सुरक्षा अनामत व आयकराची प्रचलित दरानूसारची रक्कम कपात करुन, उर्वरित रक्कम अदा केली जाईल तसेच सुरक्षा अमानतची रक्कम सुरक्षा कालावधी (६ महिने) यशस्वीरित्या पूर्ण झाले नंतर अदा केली जाईल.

११. प्रत्यक्ष काम चालू असताना कामाच्या प्रकारात बाबीच्या परिणामात चढ/उतार/व घट/वाढ झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही ठेकेदारास करावी लागेल.

१२. कामाचे देयक अदा केले नंतर भविष्यात सदर कामी महापालिकेच्या लेखापरिक्षणात आक्षेप घेतल्यास फरकाची/वा आक्षेपापोटीची भरपाईची रक्कम ठेकेदारास बिनाशर्त अदा करावी लागेल.

१३. महापालिकेकडील उपलब्ध तरतुद व निधी नुसार सदर कामाचे देयक अदा करण्यात येईल.

प्रभारी सहा. आयुक्त
प्रभाग समिती "बी"विरार (पूर्व.)

Scanned by CamScanner